# केंद्रीय योजनांच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्याबाबत

आदिवासी विकास विभागास केंद्र शासनामार्फत विशेष केंद्रीय सहाय्य योजना, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत व आदिम जमाती संवर्धन व विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी दरवर्षी निधी प्राप्त होत असतो. यानुषंगाने आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य विविध योजनांसाठी प्रस्तावाची मागणी करत आहे.

प्रस्ताव विविध बाबींअंतर्गत सादर करता येऊ शकतात. जसे -

- शिक्षण
- आरोग्य
- कृषि व संलग्न योजना
- उत्पन्न वाढीच्या योजना
- प्रशासकीय बाबी, संस्थात्मक रचना व कार्यपध्दती , संशोधन

२. सदर प्रस्ताव सामान्यत: आदिवासी समुदायासाठी व त्यांच्या सशक्तीकरण करण्यासाठी असतात. केंद्र शासनाकडून आदिम जमाती करीता (कातकरी, कोलाम, माडिया, माडिया गोंड ) विशेष निधी प्राप्त होत असतो. केंद्र शासन हे नाविण्यापूर्ण प्रस्तावांसाठी प्रात्साहन देत असते. सदर प्रस्ताव हे शासकीय विभाग त्याच प्रमाणे नामवंत संस्था/ स्वयंसेवी संस्था/ फाऊंडेशन / एजेन्सी /तज्ञ संस्था यांना सादर करता येतील.अर्ज करणाऱ्या संस्था/ यंत्रणेनी महाराष्ट्र अथवा महाराष्ट्र राज्याबाहेर उल्लेखनीय कार्य केलेले असेल तर त्या बाबतचा सविस्तर उल्लेख व अनुषंगीक कागदपत्रे ई-मेल वर पाठवू शकतात.

३. प्रस्ताव सादर करतांना मुख्यत्वे प्रस्तावाची संकल्पना , अंमलबजावणी क्षेत्र , वित्तीय तरतुद, अंमलबजावणीची कार्यपध्दती व प्रकल्पासाठी लागणारा कालावधी या बाबींचा समावेश करावा. सदर प्रस्ताव हा https://drive.google.com/open?id=१Q२IalP४U□LMV४vQtYpLCSanY-yIIzXUpp०FG०BbbxJU या गुगल फॉर्म च्या माध्यमातुन भरावा. संस्थांनी सदर प्रस्ताव हा गुगल फॉर्म मध्ये दिलेल्या format मध्ये pdf स्वरूपात mahatribes@gmail.com या ई-मेल वर पाठवावा. प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रथम फेरीची अंतिम तारीख ५.१२.२०१८ असेल.

४. आदिवासी विकास विभागाच्या सर्व क्षेत्रीय अधिका-यांना कळविण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या क्षेत्रामधील नामवंत व तज्ञ संस्था/एजेन्सी यांना प्रस्ताव सादर करण्याबाबत माहिती द्यावी तसेच प्रकल्प स्तरावरील आवश्यक वाटणारे प्रस्ताव सादर करावे. कृपया सदर परिपत्रकाचा प्रचार प्रसार website व इतर माध्यमांमधुन करण्यात

यावा.प्रख्यात भागीदार / संस्था यांचे योग्यतेवरील प्रस्ताव निवडण्याचे अधिकार विभागाने राखुन ठेवले आहेत.

अधिक माहितीसाठी श्री. अजय खर्डे (सहाय्यक कक्ष अधिकारी ) - ०२२ २२७९४१३२ ,९९८७९९९५६२ यांच्याशी संपर्क साधावा.

प्रधान सचिव यांचे कार्यालय

आदिवासी विकास विभाग,मुंबई

Reg- Inviting proposals under Central Schemes:

Dear All

Tribal Development Department, Government of Maharashtra, invites proposal under Special Central Assistance Scheme, Grants under Article 275(l) and Conservation-cum-Development (CCD) for Particular Vulnerable Tribe Groups (PVTGs). These funds are made available by Ministry of Tribal Affairs (MoTA), Government of India (GoI).

2. The proposals can be submitted under various themes such as

- Education
- Health
- Agriculture and allied activities
- Income generation
- Administrative structure/Institutional framework and Research studies.

These proposals are meant for the tribal communities in general and their empowerment.

A special fund is also made available to state government for PVTGs (Katkari, Kolam and Madia).Please note that GoI encourages innovative projects. In addition to Government departments, the proposals can also be submitted by various agencies / NGOs /Organisations / Foundations/Corporates working in the domain mentioned above. In case the applicant Organisation/agency has done some outstanding work in any other state or within Maharashtra, a brief description and related documents may be sent as additional attachments on the e-mail id.

**The proposal should include Concept note, Area of implementation, Budget details, Implementation plan with timelines and contact details**. The proposal shall be submitted through the google form:

PLEASE FILL THE FORM on following link:
https://drive.google.com/open?id=1Q2IaIP4U_LMV4vQtYpLCSanY-yIlzXUpp0FG0BbbxJU

Institutions can also send their proposal as PDF file in the format given in the Google form above to e-mail id mahatribes@gmail.com

First Round for submission of proposal will end on 5th December, 2018.

All Field officers of Tribal Development Department are requested to reach out to credible institutions, experts and organizations as well as submit their own projects. Please give this letter wide publicity on your website and other platforms. The department reserves the right to select

eminent partners/agencies/proposals on merit.

For any clarifications:- Ajay Kharde (Assistant Desk Officer) : 022-22794132,9987999562

**Office of Principal Secretary**
**Tribal Development Department**
**Government of Maharashtra**